महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विज्ञान संकुल, काष्टी

**KVS NEWS**

## सौंदानेत कृषि विज्ञान संकुलामार्फत शेतकरी मेळावा

---

# सौंदाणेत कृषी विज्ञान संकुलामार्फत शेतकरी मेळावा



मालेगाव । तालुक्यातील सौंदाणे येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान संकुल काष्टी येथील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यक्रम अंतर्गत सौंदाणे गावातील शेतकरी बांधवांसाठी शेतीतील नवनवीन तंत्रांची माहिती व्हावी म्हणून मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान संकुल काष्टी येथील प्रमुख डॉ.एस.पी. सोनवणे हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सौंदाणे गावच्या सरपंच शितल पवार व नांदगाव बुद्रुक गावच्या सरपंच अंजनाबाई देवरे या उपस्थित होत्या. यावेळी डॉ.एस.डी. पाटील (प्रकल्प अधिकारी कृषी महाविद्यालय, काष्टी) यांनी जैविक कीटकनाशकाची उपयुक्तता व प्रा. व्ही. बी. यादव यांनी डाळिंबातील मृगबहार व्यवस्थापन या विषयावर मेळाव्यासाठी आलेल्या शेतकरी बांधवांना सखोल मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

कार्यक्रम यशस्वीरित्या होण्यासाठी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एस. खांदवे,डॉ डी. आर. बिरारी (प्रकल्प अधिकारी उद्यानविद्या महाविद्यालय, काष्टी) डॉ पि.के. सुर्यवंशी, प्राध्यापक एम. एम. दौंडे (कृषी व्यवसाय तज्ञ), सौंदाणे व नांदगांव (बु) या गावातील कृषिदुत महेश पिंपरकर,हर्षल कदम,ओंकार जराड,योगेश माने, हर्षल पाटील,रोहन पाटील, सत्यम हरिश्चंद्रे, विवेक सानप, हिमांशू बच्छाव,केतन वाघ, ओमकार शेवाळे, तेजस पाटील,अभिषेक सोळंकी यांनी विशेष प्रयत्न केले.

सौंदाणे गावचे उपसरपंच श्री. प्रवीण छाजेड तसेच विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन श्री. भाऊसाहेब पवार, प्रगतशील शेतकरी श्री.संतोष खैरनार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सदर कार्यक्रमासाठी उपस्थित होते.